# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१२५५ /२३ /त.क्र.४७ /२६/०१

श्री.चंद्रकांत अंतू जाधव

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय माहिती अधिकारी
बृ.मुं.म.पा. मुख्य पर्यवेक्षक (घ.क. व्य.) यांचे कार्यालय,
म.न.पा. खटाव मार्केट इमारत, ४ था मजला, स्लेटर रोड,
नौशिर भरुचा मार्ग, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य पर्यवेक्षक बृ.मुं.म.पा.
बृ.मुं.म.पा. मुख्य पर्यवेक्षक (घ. क. व्य.) यांचे कार्यालय,
म.न.पा. खटाव मार्केट इमारत, ४ था मजला, स्लेटर रोड,
नौशिर भरुचा मार्ग, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०२.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी अपील क्रमांक ६२१/२३/०१, अपील क्रमांक ४२४/२२ यात अनुक्रमे दिनांक १९.०६.२०२३ व दिनांक ०४.०४.२०२२ रोजीच्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला असून यात मुख्य पर्यवेक्षक घनकचरा व्यवस्थापन यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची देखील मागणी केलेली आहे.

आज झालेल्या सुनावणीत तक्रारदार श्री.जाधव यांनी यात अद्यापही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले असून प्राधिकरणाने सादर केलेल्या खुलासात झालेल्या सुनावणीत पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन या आधीच झाले असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत मोफत सदनिकांकरिता माननीय प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग, कार्यकारी अभियंता गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी, (एस.आर.ए.) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे एस.आर.ए., वांद्रे प्रमुख यांच्याशी केलेल्या पत्र व्यवहारांच्या प्रती देखील आज सादर केलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त माहितीचा एक संच तात्काळ श्री.जाधव यांना देण्याच्या निर्देशासह तसेच या पत्रांवर संबंधित विभागाने तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने पत्रव्यवहार केला असल्यास तसेच

डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेअंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांना मालकीची सदनिका देण्याबाबत गृहनिर्माण विभाग अथवा एस.आर. ए. यांच्याकडून उपरोक्त पत्र व्यवहाराची अतिरिक्त कागदपत्रे उपलब्ध असल्यास ती देखील तक्रारदार यांना विनामूल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०२.२०२६**

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त